# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २०८ वा ❑ रविवार दि.०५ ऑक्टोबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


# रामलीला मैदानावर रावण दहनाचा समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न





**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर (सुधीर कोर्टीकर)**– उत्तर भारतीय संघातर्फे सिडको एन-७ च्या रामलीला मैदानावर रावण दहनाचा समारंभ मोठ्या श्रध्देने संपन्न झाला. सायंकाळी ६.३० वाजता सुरू झालेल्या या सोहळ्याची सांगता ७.३० वाजता झाली. या निमित्त आकर्षक फटाकेबाजी श्रोत्यांना पाहावयास मिळाली.

रावण दहनाच्या या पारंपारिक समारंभात मंत्री महोदय अतुलजी सावे, संजयजी केणेकर व माजी केंद्रीय अर्थमंत्री भागवत कराड यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. त्यानंतर भाजपाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख विलास कोरडेजी यांचा नंतर ज्येष्ठ पत्रकार शहापूरकर यांचाही या ठिकाणी सत्कार करण्यात आला. नंतर संजय केणेकर, भागवत कराड यांनी मार्गदर्शन केले, शेवटी समारोपाच्या भाषणात मंत्री महोदय अतुल सावे यांनी आपले मनोगत सुंदर शब्दांत व्यक्त करुन साऱ्यांना मंत्रमुग्ध केले.

उत्तर भारतीय संघातर्फे ४७ वर्षांची ही परंपरा आजही कायम सुरू आहे. रामलीला मैदानावरील तयार केलेल्या रावणाच्या पुतळ्याची उंची ६५ फूट होती. तर कुंभकर्णाच्या पुतळ्याची उंची ही ५५ फूट होती. रामलीला मैदान प्रेक्षकांनी फुलून गेलेले होते. जवळपास १५ हजाराहून अधिक भाविकांची गर्दी रामलीला मैदानावर फटाक्यांची आतषबाजी नी रावण दहनाचा हा कार्यक्रम पाहण्यासाठी झालेली होती. यंदाच्या वर्षी फटाक्यांच्या आतीशबाजीत खूप विविधता दिसून आली. जवळपास दोन लाखांच्या फटाक्यांची मंत्रमुग्ध करणारी आतीशबाजी पाहून सारे प्रेक्षक भारावून गेलेले होते.

(छायाचित्र : सुधीर कोर्टीकर)



(रावण दहन बघण्यासाठी बालगोपाल खूप मोठ्या संख्येने येतात व रावण दहानाचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत असतो, अशाच एक लहान चिमुकल्याच्या चेहऱ्यावरील निरागस भाव अतिशय सुंदर टिपले आहेत आमचे प्रतिनिधी सुधीर कोर्टीकर यांनी.)

## विशेष लेख...

# पुन्हा अंगठ्याकडे...

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

शिक्षणाच्या प्रसाराने आणि विकासाने लोकांना अंगठ्याच्या खुणेवरून सहीकडे आणले, ज्यामुळे व्यवहारांमध्ये अधिक औपचारिक आणि प्रगत पद्धत आली; मात्र, आता नवीन तंत्रज्ञानामुळे, विशेषतः डिजिटल आणि बायोमेट्रिक तंत्रज्ञानामुळे, सहीऐवजी पुन्हा अंगठ्याच्या खुणेचा (उदा. फिंगरप्रिंट स्कॅनर) वापर होऊ लागला आहे.

पूर्वी निरक्षर लोक अंगठ्याची खूण करून व्यवहारांना मान्यता देत असत. स्वातंत्र्यानंतर भारताने साक्षरतेला महत्व दिले. निरक्षणांना साक्षर करण्यासाठी अनेक योजना आखल्या.भारतात साक्षरता वाढवण्यासाठी केंद्र सरकारतर्फे विविध प्रयत्न केले जात आहेत, जसे की राष्ट्रीय साक्षरता अभियान, साक्षर भारत मिशन, शिक्षण हक्क कायदा आणि उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रम. या कार्यक्रमांचा उद्देश प्रौढ साक्षरता वाढवणे, मुलांमधील मूलभूत साक्षरता सुधारणे, आणि तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षणाचा प्रसार करणे हा आहे. या शिवाय केरळमधील एर्नाकुलमसारख्या ठिकाणी समुदाय-चालित प्रयत्नांमधून (उदा. एकूण साक्षरता मोहीम) साक्षर जिल्हा बनवण्यात यश आले.

तंत्रज्ञानाचा वापर: साक्षरता कार्यक्रम अधिक प्रभावी करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे.

२०४७ पर्यंत सार्वत्रिक साक्षरता प्राप्त करण्याच्या उद्दिष्टासह साक्षरता वाढवण्यासाठी मागील प्रयत्नांचा आधार घेण्यात आला आहे.या कामात स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने साक्षरता वाढवण्यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. शाळा, उच्च शिक्षण संस्था, कॉमन सर्विस सेंटर्स आणि कम्युनिटी सेंटर्स यांसारख्या पायाभूत सुविधांचा उपयोग साक्षरता प्रसारासाठी केला जात आहे.

साक्षरता अभियानामुळे व शिक्षणामुळे साक्षरता वाढली, लोकांना लिहिता-वाचता येऊ लागले आणि त्यामुळे ते सही करू लागले. सही करणे हे साक्षरतेचे आणि प्रगतीचे प्रतीक मानले जाऊ लागले, जे अंगठ्याच्या खुणेपेक्षा अधिक परिष्कृत पद्धत होती.

मात्र आधुनिक तंत्रज्ञान, विशेषतः बायोमेट्रिक्स अंगठ्याच्या ठशांचा वापर करते. मोबाइल फोन अनलॉक करणे असो वा बँकेत व्यवहार करणे असो, अंगठ्याच्या खुणेचा वापर आता डिजिटल स्वरूपात होतो. या तंत्रज्ञानामुळे व्यक्तीची ओळख पटवण्यासाठी आणि व्यवहारांना अधिकृत करण्यासाठी पुन्हा अंगठ्याच्या खुणेचा (फिंगरप्रिंटचा) आधार घेतला जात आहे. ही एक प्रकारे तंत्रज्ञानाच्या मदतीने अंगठ्याच्या खुणेची परतफेड आहे.थोडक्यात, हे विधान शिक्षण आणि तंत्रज्ञानाच्या विकासाच्या प्रवासावर एक सुंदर भाष्य करते, ज्यात औपचारिक साक्षरतेचा टप्पा पार करून आता बायोमेट्रिक तंत्रज्ञानामुळे पुन्हा अंगठ्याच्या खुणेकडे परत येत आहोत.

# पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयात अभिजात मराठी सप्ताह, उद्घाटन सोहळा साजरा



**ज्योतिर्मय साहित्यं**

पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयात अभिजात मराठी सप्ताह उद्घाटन साजरा करण्याच्या उद्देशाने आज दिनांक ३/१०/२५ रोजी ज्ञानेश्वरी ग्रंथ दिंडी काढण्यात आली. ग्रंथ दिंडीचे आयोजन प्राध्यापक ज्ञानेश्वर रेवतकर यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ स्वप्नील दाहात सर तर प्रमुख वक्ते म्हणून उपप्राचार्य प्रा डॉ सुधीर अग्रवाल अतिथी म्हणून पर्यवेक्षक प्रा व्ही बी वंजारीव डॉ नीता वानखेडे उपस्थित होत्या.कार्यक्रमाची सुरुवात ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रतिमेला मारल्यार्पण व द्वीप प्रज्वलित करून करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉक्टर नीता वानखेडे यांनी केले.अभिजात सप्ताह दिनानिमित्य कनिष्ठ महाविद्यालयात निबंध स्पर्धा, काव्य लेखन वकृत्व स्पर्धा आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगितले.प्रमुख वक्ते प्रा डॉ उपप्राचार्य सुधीर अग्रवाल यांनी आपल्या भाषणातून दरवर्षी ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले. मराठी भाषेचे वैभव जपणे, मराठी भाषेचे संवर्धन करणे जनमानसामध्ये मराठी भाषेच्या अभिजातची ओळख निर्माण करणे आणि या संदर्भातील संशोधन व जनजागृती वाढवणे हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट असल्याचेसांगितले अभिजात मराठी म्हणजे काय? अभिजात मराठीचे निकष काय, मराठी भाषेचे संवर्धन,जतन व मराठी भाषेचे वैभव कसे जोपासायचे यावर आपले विचार व्यक्त केले. प्रा वंजारी सर यांनी मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर करण्याचे आवाहन केले. प्रा डॉ स्वप्नील दाहात यांनी आपल्या भाषणातून मराठी भाषेला जपण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे आयोजन प्रा . डॉ नीता वानखेडे व प्रा आशिष क्षीरसागर यांनी केले तर कार्यक्रमांचे संचालन कुमारी पौर्णिमा गावंडे आणि कुमारी अक्षरा फुलझेले यांनी केले तर आभार प्रदर्शन कुमारी आरुषी गजभिये या विद्यार्थिनीनी केले. कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

# कुलस्वामिनी प्रतिष्ठान तर्फे “कोजागिरी पौर्णिमा”निमित्त दांडिया

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर**

– कुलस्वामिनी प्रतिष्ठान तर्फे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कोजागिरी निमित्त दांडियाचे महिला व मुलीसाठी आयोजन केले असून प्रवेश फक्त दांडिया ड्रेस वर असणाऱ्या महिला व मुलीसाठी असून प्रवेश मोफत आहे. गणेश उत्सव मधे घेण्यात आलेल्या स्पर्धा (मोदकफैंसी, मंगळागौर) यांचे पारितोषिक वितरण होणार आहे. प्रतिष्ठान तर्फे अल्पोपहार आणि कोजागिरी निमित्त दूध देण्यात येईल.



दांडिया मधे भाग घेणाऱ्या मधुन लकी ड्रॉ ने दहा विशेष पारितोषिक व तीन साडी मिळणार आहे. या करिता सायं ६.१५ पर्यंत कुलस्वामिनी येथे नोंदणी आवश्यक आहे. सर्व सहभागीना रिटर्न गिफ्ट मिळणारआहे. हा उपक्रम कुलस्वामिनी मंगल कार्यालय, एन ६, सिडको येथे कोजागिरी पौर्णिमा पुर्व संध्याकाळी ६ ते १० होणार आहे तरी जास्तीतजास्त महिला व मुली यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रतिष्ठानचे विलास कोरडे व सौ. अलका कोरडे यांनी केले आहे.

# वास्तुशास्त्र पेंटिंग



लघुलेख-६१

*नक्षत्र नामावलीत १८ वे नक्षत्र 'ज्येष्ठा' आहे. या नक्षत्राचा आराध्यवृक्ष "सावर" (शाल्मली) आहे. हा वृक्ष भारतभर सर्वत्र आढळतो. हे झाड वर्षातून पाच/सहा महिने निष्पर्ण असते. या झाडाला फेब्रुवारी ते मे महिन्यांपर्यंत भरभरून फुले येतात आणि मे पासून सुरू होणाऱ्या उन्हाळ्यात फळे येतात.*

*या नक्षत्रांची धैर्योषधी 'आघाडा' आहे. याची माहिती आपण पूर्वी वाचली आहे, याच स्तंभात. तसेच जेष्ठा नक्षत्राचा पर्यायी वृक्ष 'लोध्र' आहे. सध्या हा वृक्ष दुर्मिळच होत चालला आहे. दुसरा पर्यायी वृक्ष 'सरल' म्हणजे 'पाईन' हाही एक पर्यायी वृक्ष आहे. "देवदार' किंवा 'टापिकल पाईन 'या नावानेही या वृक्षाला ओळखतात. ज्येष्ठा नक्षत्राची राशी 'वृश्चिक' असते : ही तशी जलतत्वाची राशी आहे. धाडसी स्वभावासह अचुक आणि टोचून बोलण्याचा स्वभाव या व्यक्तीचा असतो. या राशीचा स्वामी 'मंगळ' आहे. मंगळ हा ग्रह स्फोटक असतो. नारिंगी आणि तांबडा हे रंग या राशीचे प्रभावी परीणाम करणारे रंग आहेत*

*ज्येष्ठा नक्षत्राची देवता "इंद्र" " आहे. या नक्षत्राच्या 3 तारका आहेत. त्याची आकृती 'कुंडला सारखी दिसते. हे नक्षत्र जुलै महिन्याच्या शेवटच्या पंधरवड्यात रात्री 9 ते 11 च्या दरम्यान डोक्यावर दिसते. इंद्रा हा त्या त्या मन्वंतरातील देवांचा राजा आहे. सध्या वैवस्वत मन्वंतर सुरु आहे. प्रत्येक मन्वंतरातील इंद्राची नांवे वेगवेगळी आहेत. या सध्या सुरु असलेल्या 'वैवस्वत मन्वंतरातील इंद्राचं नांव पुरंदर आहे. हा बलवान, सुंदर, कणखर असून बुद्दीमान आहे. तो उदार आहे. धन देणारा आहे*

*या साऱ्या बारकाव्यांची चित्रात्मक कथा म्हणजे "वास्तुशास्त्र पेंटींग" होय. जेव्हा एक चित्र जे आशयगर्भ असते तेव्हा त्या चित्रात हजारो शब्दांचे सामर्थ्य असते त्याच अर्थाने आपण साकारलेल्या, "वास्तुशास्त्र पेंटींग मध्ये आशयगर्भता असल्यामुळे, ते सामर्थ्यवान बनते हेच सामर्थ्य जातकाला प्रगतीकडे नेते.*

क्रमशः.....


द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान

डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238

# शताब्दीचे सुवर्णपंख - डॉ. हेडगेवार यांची दिव्यदृष्टी

**ज्योतिर्मय साहित्य**
**(मागील अंकावरून)**


परंतु डॉक्टरांनी यापुढील जीवनात समाजाची व देशाची सेवा करणे हेच आपले लक्ष्य मानले. एव्हाना १९२० साली टिळकयुग संपून गांधीयुग अवतरले होते. परंतु डॉक्टरांच्या जीवनावर लोकमान्य टिळकांचा आणि स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या विचारांचा पगडा होता. ते गांधी विचारांचे कार्यकर्ते म्हणून अखिल भारतीय काँग्रेसच्या नागपूर अधिवेशनाचे कार्यवाह म्हणून उत्साहाने कार्यरत होते. काँग्रेसने खिलाफत चळवळीच्या बाजूने प्रचार सुरू केला तेव्हा त्यांना काँग्रेसचे हे दुष्टीकरण धोरण आवडले नाही. याच काळात रत्नागिरीच्या कारागृहात असताना स्वातंत्र्यवीर सावरकरांनी लिहिलेले 'इसेन्शियल्स ऑफ हिंदुत्व' हे पुस्तक त्यांच्या वाचनात आले. त्यांनी प्रत्यक्ष सावरकरांची भेट घेऊन या पुस्तकाचे हस्तलिखित मिळविले होते व त्याची प्रत नागपुरात छापली होती. देशाच्या भवितव्यासाठी आपण राष्ट्रीय विचारांनी तरुणांचे संघटन कसे स्थापन करावे, कोणती पावले टाकावीत, संघटना कशी असावी, तिला काय नाव द्यावे हे विचार त्यांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण करीत होते. या काळात त्यांनी स्वातंत्र्य या नावाचे दैनिक वृत्तपत्रही काही काळ चालविले होते. वर्धा येथे सेवाग्रामामध्ये जाऊन ते गांधीजींशी चर्चा, विचार विनिमयही करीत असत. ना. ह. पालकर यांच्या हेडगेवार चरित्रात गांधी-हेडगेवार संवादाची मौलिक टिप्पणी दिली आहे. तेव्हा गांधीजींनी आपल्या अनुपस्थितीत मी संघ शाखांना भेट दिली असा उल्लेख केला आहे आणि स्वयंसेवक देशासाठी कसा समर्पित भावनेने कार्य करेल याचे डॉ. हेडगेवारांनी केलेले वर्णन ऐकून गांधीजी थक्क झाले होते व त्यांनी छान अशी त्यांना पावतीही दिली होती. (हेडगेवार चरित्र, ना. ह. पालकर) डॉ. हेडगेवार यांनी गांधीजींचा सेवाविचार आणि सावरकरांचा हिंदुत्व विचार यांचे अनोखे मिश्रण आपल्या संघटनेमध्ये रूजविल्याचे दिसून येते.

**लोकोत्तर सेवादृष्टीः**

जेव्हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विजयादशमीला १९२५ साली स्थापना करण्यात आली त्यावेळी सुमारे २६ तरुण उपस्थित होते. त्यापैकी दहा-बारा प्रमुख संघटक होते. वर्षभरातच त्यांचे रूपांतर १२०० स्वयंसेवकात झाले. सुमारे ५ वर्षात सबंध महाराष्ट्रात हे संघटन पसरले. देशभर त्याच्याविषयी तरुणांच्यामध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आणि पाहता पाहता लाखोंनी तरुण वर्ग या संघटनेकडे आकर्षित झाला. पायाभूत सुविधा नाहीत, मोठमोठ्या इमारती नाहीत, फक्त सार्वजनिक मैदाने व तेथे भरणाऱ्या शाखा हेच संघटनेचे खरे बळ होते. पण त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रबळ इच्छाशक्ती, असीम ध्येयवाद आणि लोकोत्तर दृष्टिकोन यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ एक संघटन, एक विचार आणि एक चळवळ म्हणून लोकप्रिय होत गेला. कारण देशातील तरुणांची नाडी डॉक्टरांनी ओळखली होती. आरंभापासूनच नित्य शाखा या उपक्रमावर डॉक्टरांचा भर होता. त्यांचे असे मत होते, की शाखा हीच संघाची प्रयोगशाळा आणि संघाचे कार्य हे राष्ट्र घडविण्याचे ईश्वरी कार्य आहे. संघ शाखातील उपक्रमांकडे डॉक्टर समाजशास्त्रीयदृष्टीने पहात होते. त्यांनी हिंदू समाजातील सर्व प्रकारच्या दोषांचे निर्मूलन करण्यासाठी केलेली मिमांसा मोठी अर्थपूर्ण आहे. आपले समाजजीवन जातीवाद, रूढी परंपरांनी पोखरले आहे. या विराट हिंदू समाजातील निद्रिस्त चैतन्य जागृत केल्यास राष्ट्रपुरुषातील सामर्थ्य पुन्हा नवचैतन्याने भरून येईल असा त्यांचा विश्वास होता. कुठल्याही समाज शास्त्रज्ञाने समाजातील गुणदोषांची मिमांसा करून त्यावर भाष्य करावे असे डॉक्टर मोठ्या दूरदृष्टीने विश्लेषण करतात. त्यांचा हिंदू समाजातील सकारात्मक ऊर्जाशक्तीवर विश्वास होता. ही



प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर
ई-1108, कल्पतरू, ग्लोरिया ग्रेस,
बावधन, पुणे मो. 9225313592



ऊर्जाशक्ती जागृत करून आपण स्वातंत्र्य लढा यशस्वी करू शकतो. एवढेच नव्हे तर राष्ट्रजीवनात आधुनिकतेचा आणि परिवर्तनाचा मंत्र पेरू शकतो याच भावनेने त्यांनी संघटनेस नवी दिशा दिली.

**अशी ही वादळवाटः**

२७ मार्च १९३३ च्या गुढीपाडवा उत्सवात डॉक्टरांनी केलेले बौद्धिक उद्बोधन अत्यंत महत्त्वाचे होते. या बौद्धिकामध्ये त्यांनी असे सूत्र मांडले, की संघावर केली जाणारी जातीय टीका अत्यंत अयोग्य आहे. संघाचे कार्य सामायिक सुधारणेचे आहे. संघ राष्ट्रीयदृष्टीने समाजाची जडणघडण करण्यासाठी कटिबद्ध आहे. सामाजिक समरसता या सिद्धांताची बीजे डॉक्टरांच्या या भाषणामध्ये शोधता येतात. पुढे त्यांचे हे सूत्र बाळासाहेब देवरस यांनी सिद्धांत रूपाने सामाजिक समरसता या संकल्पनेचा विकास केल्याचे दिसून येते. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात डॉक्टरांनी घेतलेला भाग याचे निखळ उदाहरण म्हणजे जंगल सत्याग्रहातील त्यांना झालेला कारावास हे होय. प्रत्येक स्वयंसेवकाला वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेण्यास त्यांनी मोकळीक दिली होती. डॉक्टर जेव्हा कारावासात होते तेव्हा बाबूराव भेदी आणि बाबासाहेब आपटे यांनी नित्य शाखा कार्य चालविले, तर त्यांचे सहकारी ल. वा. परांजपे यांच्यावर सरसंघचालक पदाची धुरा सोपविण्यात आली होती. परांजपे यांनी ती समर्थपणे पार पाडली. संकटाच्या प्रत्येक प्रसंगी आपले संघटन वादळातून कसे पुढे न्यावयाचे आणि देशात व समाजात संघटनेचे सामर्थ्य कसे वाढवावयाचे याची एक विलक्षण हातोटी त्यांच्यामध्ये होती. संघटन चातुर्य हा संघाच्या कार्यप्रणालीचा एक मौलिक भाग होय. त्याची बैठक डॉक्टरांनी घालून दिली, हे विशेषत्वाने नमूद केले पाहिजे. 'रणी फडकती लाखो झेंडे । भगवा झेंडा एकचि हा।' असे खांडेकरांचे एक स्फूर्तीदायक गीत आहे. डॉक्टरांनी भगवा ध्वज हा गुरु मानला कारण भगवा ध्वज हा त्याग, पराक्रम आणि पावित्र्याचे प्रतीक आहे अशी त्यांची श्रद्धा भावना होती. एखाद्या व्यक्तीला, मूर्तीला किंवा ग्रंथाला गुरु न मानता शतकानुशतकाची समर्पणाची परंपरा असलेला भगवा ध्वज हाच आपला गुरु आहे ही त्यांची भूमिका स्पष्ट व तर्कसंगत होती. (संघाची बलस्थाने, यशवंत कानेटकर, पृ. ८) संघकार्याचा विस्तार व प्रसार गुरुदक्षिणेतून प्राप्त होणाऱ्या निधी संकलनातून चालतो आणि त्याची एक स्वतंत्र व्यवस्था आहे. नित्य शाखांच्या कार्यपद्धतीमध्ये योगासने, सूर्यनमस्कार, सुभाषित, बौद्धिकवर्ग, बोधकथा अशा कितीतरी नावीन्यपूर्ण उपक्रमांची आखणी केली जाते. प्रारंभापासून आजपर्यंत शाखा कार्यप्रणालीत काळानुरुप बदल झाले असले तरी डॉक्टरांनी घालून दिलेली चौकट ही कायम आहे आणि त्याआधारे सर्व संघकार्याची दिशा मजबूतपणे चालत आहे. १९२५ ते १९४० ह्या १५ वर्षांच्या काळात पूजनीय डॉक्टरांनी संघ देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचविला आणि प्रचारकांची पहिली पिढी तयार केली. या काळात बाळासाहेब देवरस यांनी कलकत्ता येथे जाऊन बंगाल प्रांतात संघकार्याची बैठक घालून दिली. **(क्रमशः)**

# पूरग्रस्तांना ज्येष्ठांची दिवाळी भेट




**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** - महापुराच्या संकटात सापडलेल्या पुरग्रस्तांच्या मदतीसाठी पिंपळे सौदागर परिसरातील उन्नती सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांनी मदतीचा हात पुढे केला असून दिवाळीनिमित्त विविध स्वरुपात भेटवस्तू दिल्या आहेत. लिनियर गार्डन ज्येष्ठ नागरिक संघटनेच्यावतीने पस्तीस हजार रुपयांचे डाळ, तांदूळ , तेल, पोहे, तिखट, मीठ, बिस्किटपुडा, आटा, चहापुडा आदी खाद्य पदार्थाचे किट तयार करुन दिले. रोजवुड सोसायटीतर्फे एक किलो आटा असलेले एकशे पंचवीस पाकिटे, कुणाल आयकॉन सोसायटीतर्फे अकरा हजार रु. रोख, तसेच वैयक्तिक, पातळीवर जयश्री केदार यांनी महिलांसाठी तीस आणि अनिता कुलकर्णी यांनी सहा नव्या साड्या पुरग्रस्तांसाठी भेट म्हणून दिल्या आहेत. शुक्रवारी उन्नती सोशल फाउंडेशनच्या कार्यालयात डॉ. कुंदाताई भिसे आणि संजय भिसे यांच्याकडे या वस्तू सुपुर्द करण्यात आल्या. याप्रसंगी भाजपा ओबिसी सेलचे अध्यक्ष मनोज ब्राह्मणकर, लिनियर गार्डन ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष अशोक वारकर तसेच दिलिप ताम्हणकर, शरदकांत नेरकर, राजेंद्र महाजन, हरिमोहन तिवारी, रमेश काळे, दगाजी पाटील, सुरेश बरडे, रोजवुड सोसायटीचे राजू देवतारे, पाचपुते, भार्गव, राष्ट्र सेविका समितीच्या कुलकर्णीताई, ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुभाषचंद्र पवार, बाळकृष्ण चौधरी , रमेश वाणी आदींची प्रमुख उपस्थिती होती.


# पुणे आकाशवाणी केंद्राचा ७२ वा स्थापना दिवस

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे (विभावरी कुलकर्णी ) ''नमस्कार श्रोतेहो.... हे आकाशवाणीचे पुणे केंद्र आहे. सकाळचे पाच वाजून सत्तावन्न मिनिटे आणि बारा सेकंद झाले आहेत. आपल्या आजच्या सभेला सुरुवात करु या मंगलध्वनीने.... आणि मग तो मंगलध्वनी सुरु व्हायचा. अगदी लहानपणी पासून दिवसाची सुरूवात अशीच होते. आणि दर पाच मिनिटांनी बदलणारे कार्यक्रम वेळ सांगतात. सकाळच्या घाईत घड्याळ बघावे लागत नाही. ते काम रेडिओ ऐकला की आपोआप होते. शिवाय ते कार्यक्रम ज्ञानात भर घालतात हा खूप मोठा आणि महत्वाचा फायदा ! आजही मला लहानपणी निवेदन करणारे निवेदक व त्यांचे निवेदन आठवते. सुधा नरवणे प्रादेशिक बातम्या द्यायला आल्या की शाळा कॉलेजला निघायची योग्य वेळ झाली हे लक्षात यायचे. आणि त्या बातम्या संपल्या की उशीर झाला असे समजायचे.

सकाळी सकाळी रेडिओ लावायची जुनी सवय बऱ्याच जुन्या आठवणी जाग्या करते. आज गाणे ऐकले ''शब्द शब्द जपून ठेव'' एकीकडे काम चालू होते. आणि इतके अर्थपूर्ण गाणे ऐकत असताना माझ्या मनात कसे विचार येतात याचे हसू आले. आणि जपून ठेवलेल्या वस्तू आठवायला लागल्या. आणि कुठे कुठे जीव अडकतो याची गंमत वाटली. परवा सहज कपाट आवरताना जरा पिवळसर पडलेली कॅरीबॅग सापडली. उघडून बघितले तर ''रेडिओचे लायसन'' सापडले. आता असे वाटेल हा काय प्रकार आहे? पण पूर्वी (मी लहान असताना) रेडिओ साठी परवाना आवश्यक होता. एका वर्षा साठी १/२ रुपये पोस्टात भरून त्या पुस्तकावर तिकीट लावून आणावे लागायचे. आणि घरात टेबल सारखे मोठे रेडिओ असायचे तो नीट ऐकण्यासाठी ३/४ फूट लांबीची व २/३ इंचाची तांब्याची जाळी असलेली पट्टी घरात लावावी लागायची. आणि छोटा रेडिओ ( ट्रांझिस्टर ) सायकलच्या हॅण्डलला लावून लोक ऐटीत फिरायचे. आणि ज्याच्याकडे लायसन नसेल तो लपवून ट्रांझिस्टर नेत असे. हे सर्वच रेडिओ मात्र नवनवीन कपडे घालायचे. त्यात गृहिणीची कलाकुसर व दृष्टी याची जणू परीक्षा व्हायची. काही जणी तर त्यावर स्वहस्ते भरतकाम करायच्या आणि कौतुक मिळवायच्या.

आमच्या कडे मोठ्ठा रेडिओ होता. लांबून बघितले तर पुस्तकांचे कपाट वाटावे असा होता. मी कायम त्याच्या बटणावर पाय ठेवून वर चढून दूध प्यायला बसायची. मग जेवायला बसायची. ही बाल सवय त्याचा उपयोग कळायला लागल्यावर सुटली. विशेष म्हणजे या रेडिओचे सर्वत्र दर्शन होते. शेतात, मळ्यात, चौकात, पारावर, बागेत कुठेही सूर ऐकू येतात. मधल्या काही काळात असे भय वाटत होते की सगळ्या आधुनिक साधनांच्या गदारोळात आपला रेडिओ लुप्त होईल का? पण रेडिओने आपले स्थान कायम ठेवले आहे. स्वरूप बदलले आहे. सुटसुटीत झाले आहे. पूर्वीच्या अडचणी ( रेडिओ





वापरातील ) आता नाहीत. त्याने प्रत्येकाच्या मोबाईल मध्ये स्थान मिळवले आहे. आणि पेन सारखे छोटे स्वरूपही धारण केले आहे. आणि आता ऐकू येणारी स्टेशन्स सुद्धा वाढली आहेत. काही वर्षांपूर्वी प्रसारित होणारे कार्यक्रम आधुनिक स्वरूप धारण करून पुन्हा प्रसारित होऊ लागले आहेत.

या रेडिओच्या अनंत आठवणी बऱ्याच जणांच्या मनात जागृत असतील. रेडिओवर एक जाहिरात लागते. एक सखी दुसरीला विचारते, ''कुटं ग शिकलिस एवढं ग्यान?'' लगेच दुसरी उत्तरते, ''आपल्या रेडिओनं श्यानं केलंय की, तू बी ऐकत जा.'' हे ऐकून अगदी पटले. खरेच जे नियमित रेडिओ ऐकतात त्यांचे मन विविध माहिती, ज्ञान, आरोग्य, गृहिणींना मार्गदर्शन, मनोरंजन, यांनी भरून जाते. या वर लागणारी नभोनाट्ये तर मला अजून आठवतात. रात्री ९:३० ही वेळ ठरलेली असायची. नाट्यगीते, चित्रपट गीते, सगळे नियमित ऐकवून बऱ्याच लोकांचा कान तयार केला आहे. आणि या साठी वेगळा वेळ द्यावा लागत नाही. शिवाय डोळेही बिघडत नाहीत. या रेडिओची सुरुवात भारतात १९२३ साली झाली. पण ती खाजगी कंपनी होती. आणि ती दिवाळखोरीत निघाली. नंतर १९३६ मध्ये ही कंपनी सरकारने ताब्यात घेतली आणि ''ऑल इंडिया रेडिओ'' असे नामकरण केले. ७१ वर्षे सेवेची, आकाशवाणी पुणे केंद्राच्या अविस्मरणीय प्रवासाची !

२ ऑक्टोबर १९५३ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजीभाई देसाई यांचे हस्ते आकाशवाणीच्या पुणे केंद्राचे उद्घाटन झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष होते तेव्हाचे नभोवाणी व माहिती मंत्री डॉ. बाळकृष्ण केसकर. बहुजन हिताय, बहुजन सुखाय हे ब्रिदवाक्य डोळ्यासमोर ठेवून माहीती, मनोरंजन आणि मराठी भाषेचा, महाराष्ट्राच्या संस्कृतीचा वारसा जपणारी आपली ही पुणे आकाशवाणी. प्रासंगिक कार्यक्रम सादर करणे. हे तर रेडिओचे खास वैशिष्ट्य आहे. रेडिओवर प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमांवर लिहायचे म्हंटले तर एक वेगळाच लेख होईल. आज जागतिक रेडिओ दिनाच्या निमित्ताने भारतातील रेडिओ विषयी काही लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. हा विषय खूप मोठा आहे. जे माझ्या सारखे रेडिओ प्रेमी आहेत त्यांना नक्कीच असे वाटते, हा रेडिओ अजरामर होवो. पुणे आकाशवाणी दिनाच्या शुभेच्छा !







# गोष्ट चार लोकांची...

**ज्योतिर्मय साहित्य**


अरे किती पसारा केला आहे ? जरा निट आवरून ठेवा चार लोकं येतात घरी बरं दिसत नाही. जेव्हा चार लोकं येतात घरी तेव्हा त्यांच्यासमोर ओरडायला लावू नका. तंगड्या पसरून बसू नकोस, निट मांडी घालून बस चार लोकांत चांगलं दिसतं का ते ? चार लोकांमधे आम्हाला मान खाली घालायला लावू नको. चार लोकांमधे आपली मान ताठ दिसायला हवी. मुलांना उद्देशून म्हंटलं जायचं परिक्षेत नापास झालास तर, किंवा मुलांना उद्देशुन म्हंटलं जायचं काही वेडवाकडं वागलीस तर चार लोकं शेण घालतील आमच्या तोंडात. तेव्हा त्याचा अर्थ समजण्याचे ते वय नव्हतं. जेव्हा चार लोकं येतात घरी तेव्हा त्यांच्याशी निट आदराने बोलावं, त्यांना पाणी आणून द्यावे. मुलिंनी चार लोकांसमोर उगिच पुढे पुढे करू नये. चार लोकांशी चांगले संबंध ठेवावेत, एकमेकाची मदत करावी. खरंच सारखं ते चार लोकं, चार लोकं ते असं म्हणतील आणि तसं म्हणतील हे ऐकून ना कंटाळा यायचा. काय आठवलं ना बालपण ? लहानपणी तुमच्या आमच्या सगळ्यांच्या घरातलेच संवाद आहेत हे.

मला तर ना लहानपणी प्रश्न पडायचा कोण आहेत ही चार लोकं ? बरं आईवडिलांनी किती जरी चार लोकांबद्दल सांगितलं तरी घरी कोणी येत नसत, वर्षभरात सण किंवा काही कार्यक्रम असेल तर येणारी माणसं म्हणजे आजी आजोबा, मामा, मावशी, काका वगैरे ही तर नात्यातली मंडळी मग चार लोकं कोण ? ह्या चार लोकांबद्दल मनात एक प्रकारची भिती असायची, आणि थोडा रागही असायचा मनात. घरात काही जरी केलं तरी सतत धाक त्या चार लोकांचा.



बरं एक कळायचं नाही नेमकी चार ही संख्या कुठुन आली ? तिन किंवा पाच का नाही ? कशी दिसत असतील ती चार माणसं, मोठ्या दाढीमिशा असतील का त्यांच्या ? खुप रागीट असतील का ? बालबुद्धीप्रमाणे असे प्रश्न यायचे त्यावेळी मनात.

बालपण सरलं, मोठा झालो. मोठा झाल्यावर देखील ती चार लोकं काही पाठ सोडायला तयार नाहीतच. असे कपडे घालू नकोस, मित्राबरोबर नाक्यावर गप्पा मारत उभा रहात जाऊ नकोस, येणारी जाणारी चार लोकं बघत असतात उगिच काहिबाही बोलायला नको त्यांनी. लग्नाचं वय झालं तुझं चार लोकं येतात विचारायला, चौकशी करतात. आयला डोकं नुसतं गरगरायला लागतं काही वेळा त्या चार लोकांचा विचार करून. मोठेपणी विचार केला तर असं लक्षात आलं अरे ती चार माणसं तर कधी आलिच नाहित. मग काय एखाद्या बागुलबुवाची भिती दाखवयाची तशी तेव्हा पालक मंडळी चार लोकांची भिती दाखवायचे का ? इतक्या वर्षांपासून ज्या चार लोकांबद्दल ऐकलं होतं ती कधीच का बरं आली नसतील ? जेव्हा काही कठिण प्रसंग आले होते आयुष्यात, जेव्हा कधी गरज होती आधाराची तेव्हा बहुधा त्यांना वेळ नसेल मिळाला. जाऊ दे त्यांना कशाला दोष द्यायचा कदाचित ती चार माणसं दुसऱ्या कोणाकडे गेली असतील अशी आपण आपल्या मनाची समजुत करुन घेऊ. असं वाटतं का आपण सतत विचार करतो त्या चार लोकांचा? काय फायदा होणार आहे ती चार लोकं येऊन ? आतापर्यंत आलं का कोणी, काही अडलं का आपलं त्यांचावाचुन? मग आपण तरी का वाट पहायची त्यांची?



शेखर देशपांडे
संपर्क : 98817 34580

तरूणपण संपून वार्धक्याकडे वाटचाल सुरू झाल्यावर जाणिव होते, कुठेतरी डोक्यात विचार चमकून जातो यायला हवी होती कधितरी चार लोकं सल्ला द्यायला, कधी आधाराची गरज होती तेव्हा. एक मात्र खरं आहे कोणी काही जरी म्हंटलं तरी जिवनातील एक अंतिम सत्य कोणीच नाकारू शकत नाही शेवटी चार माणसं लागतातच.

# दवाखाना

## कुष्ठरोग - भाग ४

ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार मैत्रांनो !

मागील भागांत आपण कुष्ठरोगाच्या दोन मुख्य प्रकारांविषयी जाणून घेतले. कुष्ठरोगाला कारणीभूत असलेला मायकोबॅक्टेरियम लेप्रे या जिवाणूचा रागरंग फारच वेगळा आहे. जिथे प्रमाणित पेट्री डिशमध्ये (कृत्रिम माध्यम) याचेच जातभाई असलेले क्षयरोगाचे जिवाणू मस्तपैकी खाऊनपिऊन गलेलठ्ठ होतात, तिथे हे हे चाणाक्ष जिवाणू किती ग बाई मी हुश्शार असे गाणे गात त्या दिखाऊ आमिषाला भुलत नाहीत. त्यांना निर्जीव तबकडी चालत नाही. जिवंत यजमानाच्या जिवावर गुणाकार साधतांना, विशेषतः उंदरांच्या पायांच्या मऊ गादीवर लोळतांना त्यांना भलताच ऊत येतो बरं कां मंडळी! (त्यांना मर्ढेकरांचे ''पिंपातले मेलेले उंदीर'' अजिबातच चालत नाहीत हं!) त्यांच्या याच विक्षिप्त स्वभावधर्मामुळे पेट्रीडिशच्या माध्यमाद्वारे प्रयोगशाळेत त्यांचा अभ्यास करणे अशक्य असते.




अशा परिस्थितीत रोग्याची वारंवार वैद्यकीय तपासणी संबंधित व्यक्तींना मोलाचा अनुभव देत असते. पाठ्यपुस्तकांतील उतारे इथे कुचकामी असतात. याचे जिवंत उदाहरण म्हणजे वर्षानुवर्षे कुष्ठरोगाशी संबंधित कार्य करणाऱ्या विभागीय आरोग्य कर्मचाऱ्यांचे महत्वपूर्ण योगदान! त्यांना अल्पकालीन प्रशिक्षणानंतर त्वचेवरील चट्टे, चट्ट्याच्या मध्यभागी असलेला फिकट रंग आणि चट्ट्याची संवेदनहीनता, जाड झालेल्या चेता आणि स्नायू दौर्बल्य ही कुष्ठरोगाची लक्षणे बिनचूक ओळखता येतात. प्रयोगशाळेतील तपासणीचे जोडकाम अल्पजिवाणूजन्य कुष्ठरोगासाठी कदाचितच मदतीसाठी उपलब्ध असल्याने हे प्रत्यक्ष निदान महत्वाचे! मात्र मला संबंधित मंडळींना हे प्रकर्षाने सांगावेसे वाटते की कुष्ठरोगाचे निदान अत्यंत काळजीपूर्वक केले पाहिजे. शंका असल्यास तज्ज्ञांचा सल्ला घेणे योग्य! इथे चुकीच्या निदानाला कदापि माफी नाही, कारण एकदा या रोगाचा ठसा उमटला की रोग्याच्या पारिवारिक आणि सामाजिक आयुष्याचे गणित संपूर्णपणे बिघडते. निव्वळ औषधोपचाराने हे क्लिष्ट गणित सोडवता येत नाही हे सत्य सर्वांनी लक्षात असू द्यावे!

जागतिक आरोग्य संघटनेने पुढाकार घेत १९९५ सालापासून त्या आधीच्या उपचारपद्धतीतील असमानता काढून टाकली आहे. या संघटनेद्वारे स्थापित केलेली प्रतिजैविकांची बहुऔषधी उपचार पद्धती कुष्ठरोगावरील मानक उपचार म्हणून जगभरात स्वीकारल्या गेली आहेत. हे उपचार सर्व रुग्णांसाठी विनामूल्य उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. या प्रणालीचे सकल फायदे हवे असल्यास त्याविषयी नियम व अटी पूर्णपणे लागू असतात. सर्वप्रथम कुष्ठरोगाचे निदान लवकरात लवकर केल्या जाणे अपेक्षित आहे. एकदा औषधे सुरु केल्यावर लक्षणे कमी झाली किंवा औषधांचे मामूली दुष्परिणाम दिसल्यावर देखील डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार नियमितपणे संपूर्ण उपचार घेणे आवश्यक आहे.

बहुऔषधी उपचार पद्धतीचे फायदे:

*या प्रभावी पद्धतीमुळे कुष्ठरोगाचे संपूर्ण निर्मूलन होण्याची टक्केवारी ९८ % इतकी अधिक आहे.

*याने औषध प्रतिरोधकता टाळता येते तसेच रोगाच्या पुनरावृत्तीची शक्यता अत्यंत कमी असते.

*लवकर निदान केल्यासरशी बहुऔषध प्रणाली सुरु केल्यास भविष्यातील गंभीर विकृती आणि अपंगत्व टाळता येतात. हे लहान मुलांच्या भवितव्यासाठी अतिशय महत्वाचे आहे.



लेखिका
डॉक्टर मीना श्रीवास्तव

*समाजासाठी फायदा असा की हे अतिशय प्रभावशाली उपचार सुरू झाल्यावर अक्षरशः ७२ तासातच रुग्ण इतरांसाठी संसर्गजन्य राहत नाही.

**मात्र औषधोपचाराद्वारे नसांना आधीच झालेले अपाय आणि विकृती पूर्वस्थितीवर येत नाही. म्हणूनच रोगाचे लवकरात लवकर निदान होणे गरजेचे आहे.

मंडळी, एखादे औषध एखाद्या रोगावर किती रामबाण उपाय असू शकते याचे अतिशय समर्पक उदाहरण म्हणजे रिफाम्पिसिन हे प्रतिजैविक. क्षयरोगाच्या आणि कुष्ठरोगाच्या उपचारांत याने क्रांती घडवून आणली. बघा ना, ज्या कुष्ठरोगासाठी डॅप्सोन या एकल औषधाच्या गोळ्या अंदाजे १५ वर्षे घ्याव्या लागत होत्या त्याच आता २८ दिवसांतून एकदा घेण्यात येणाऱ्या रिफाम्पिसिनसोबत दिल्यास ६ महिने किंवा १ वर्षच घ्याव्या लागतात! म्हणूनच हे रिफाम्पिसिन कुष्ठरोग्यांसाठी अमृतासमानच आहे मैत्रांनो! शिवाय २८ दिवसांतून एकदा घेतल्यामुळे त्याचे दुष्प्रभाव किंवा जिवाणूंचा प्रतिरोध हे प्रकार इथे नाहीतच! जोडीला बहुऔषधी उपचारपद्धतीनुसार क्लोफॅझिमिन हे आणखी एक प्रतिजैविक जोडले की उपचारांची दाहकता आणखी वर्धमान होते.

अल्पजिवाणूजन्य कुष्ठरोगासाठी रिफाम्पिसिन आणि डॅप्सोन ही २ प्रतिजैविके ६ महिन्यांकरता देण्यात येतात. बहुजिवाणूजन्य कृष्ठरोगात रिफाम्पिसिन, डॅप्सोन आणि क्लोफॅझिमिन ही ३ प्रतिजैविके १२ महिन्यांकरता देण्यात येतात. या २८ दिवसांच्या चक्रात रिफॅम्पिसिन फक्त पहिल्या दिवशी दिले की मोहीम फत्ते!

अधिक चर्चा पुढील भागात!

****




## दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर 'आली मोठी शहाणी'ची घोषणा

### हृता दुर्गुळे- सारंग साठ्ये पहिल्यांदाच झळकणार एकत्र

ज्योतिर्मय साहित्य


मराठी चित्रपटसृष्टीत सतत नवनवीन प्रयोग होत आहेत. दमदार कथा, हटके विषय आणि फ्रेश जोड्या यामुळे प्रेक्षकांची उत्सुकता कायमच वाढत असते. याच पार्श्वभूमीवर दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर एका खास चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. 'आली मोठी शहाणी' या चित्रपटातून प्रेक्षकांना एक आगळीवेगळी ऑनस्क्रीन जोडी पाहायला मिळणार आहे. नोव्हेंबरमध्ये या चित्रपटाचे चित्रीकरण सुरू होणार असून या चित्रपटात पहिल्यांदाच हृता दुर्गुळे आणि सारंग साठ्ये एकत्र झळकणार आहेत. त्यांच्या ताज्या केमिस्ट्रीकडे सगळ्यांचेच लक्ष लागले आहे.


'हॅशटॅग तदेव लग्नम्' या चित्रपटातून सुबोध भावे आणि तेजश्री प्रधान यांची जोडी प्रेक्षकांसमोर घेऊन येणारे दिग्दर्शक आनंद दिलीप गोखले यावेळी या नव्या जोडीला घेऊन येत आहेत.


दिग्दर्शक आनंद दिलीप गोखले म्हणाले, ''लवकरच प्रेक्षकांसाठी एक मनोरंजक चित्रपट घेऊन येत आहोत. या चित्रपटाची कथा लवकरच समोर येईल, इतकं नक्की की, हृता आणि सारंग यांच्या जोडीला प्रेक्षक भरभरून प्रेम देतील, याची मला खात्री आहे.''


फाईन ब्रू प्रॉडक्शन्स प्रस्तुत व ट्रू होप फिल्म वर्क्स यांच्या सहयोगाने प्रेक्षकांच्या भेटीला येणाऱ्या या चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन आनंद दिलीप गोखले यांनी केले असून ईशा मूठे, श्रुती साठे व जयकुमार मुनोत हे या चित्रपटाचे निर्माते आहेत.



















हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559